प्र.० साक्षी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैराग

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0490 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/12/2024 00:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 30/11/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/11/2024

**Time From (वेळेपासून):** 12:02 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/12/2024 **Time (वेळ):** 00:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/12/2024 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वैराग ,बार्शी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश अशोक बुरगुटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उपळे दुमाला,बार्शी,वैराग,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उपळे दुमाला,बार्शी,वैराग,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9503744009

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल इरण्णा सोनकाबळे | | | 1. राजस्व नगर, विजापूर रोड,, सोलापुर,वैराग,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मनोज किशोर वाघमारे | | | 1. सिध्दार्थ नगर, वैराग,बार्शी,वैराग, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.30.11.2024

मी गणेश अशोक बुरगुटे, वय- 44 वर्षे, व्यवसाय- मुख्याध्यापक, रा. ग्लोरी इंग्लिश मेडीयम स्कुल, मु.पो. उपळे दुमाला, ता. बार्शी, सोलापूर मो.नं. 9503744009. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,
मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, मी ग्लोरी इंग्लिश मेडीयम स्कुल, उपळे दुमाला, बार्शी येथे मुख्याध्यापक म्हणून नोकरीस आहे. सदर शाळेचा संस्था चालक म्हणून मीच काम पाहत आहे. आज रोजी सकाळी 10.00 वा. चे सुमारास माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार अँन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस उप अधीक्षक श्री. कुंभार यांना फोन व्दारे दिली. त्यानंतर सुमारे 11.30 वा. चे सुमारास माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीस उपअधीक्षक कुंभार साहेब हे पंच व सापळा पथकासह शासकीय वाहनाने वैराग धाराशीव रोडवरील सर्जापूर गांवाकडे जाणा-या फाटयाजवळ आले. पोलीस उपअधीक्षक कुंभार साहेब यांनी सापळा पथक व दोन शासकीय पंच यांची माझ्याशी ओळख करुन दिली. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक कुंभार साहेब यांनी मला माझी तक्रार विचारली असता, मी खालीलप्रमाणे माझी तक्रार थोडक्यात सांगीतली.

माझे वडील नामे अशोक सुर्यभान बुरगुटे, वय 70 वर्षे यांचा दि. 02.10.2024 रोजी मॉनिंग वॉक करीत असताना उपळे दुमाला, बार्शी-तुळजापुर रोडवर मोटर सायकलीने धडक दिल्यामुळे अपघात झालेला होता. त्यावरुन दि. 11.10.2024 रोजी माझ्या वडिलांच्या तक्रारीवरुन वैराग पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. 413/2024, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281, 125(ड्र), 125(ड), मो.वाहन अधि. कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल असून, सदर गुन्हयाचा तपास हे पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे हे करीत आहेत. माझ्या वडीलांचे झालेल्या अपघाताबाबत मला इन्शुरन्स कंपनीस क्लेम करणे असल्यामुळे त्यानंतर काही दिवसाने मी व माझे पत्रकार मित्र श्री. बलभीम लोखंडे असे सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे यांना भेटून इन्शुरन्स क्लेम साठी घटनास्थळ पंचनामा आवश्यक असल्याचे त्यांना सांगीतले असता, त्यावेळी त्यांनी कोणाचेही नाव न घेता त्यांचे ओळखीचे वकील यांचे मार्फत संपर्क करावा लागेल असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना माझे मित्र वकील असून, क्लेमसाठी सदर केस त्यांना देणार असल्याचे सांगीतले, त्यावर पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे यांनी ते सध्या विधानसभा निवडणूकीमध्ये व्यस्त असल्यामुळे आता पंचनामा तयार नसून, निवडणूक झाल्यानंतर भेटायला या असे त्यांनी सांगीतले. त्यानंतर दि. 29.11.2024 रोजी सकाळी माझे पत्रकार मित्र श्री. बलभीम लोखंडे यांनी मला पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे यांनी घटनास्थळ पंचनामा कागदपत्रासंबंधी वैराग पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलावले असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे दि. 29.11.2024 रोजी मी वैराग पोलीस ठाणे येथे जावून पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे यांची भेट घेतली असता, ते मला म्हणाले की, जर तुम्ही मी सांगत असलेल्या वकीलाकडे क्लेमसाठी केस देत नसाल तर, तुम्हाला 20,000/- रुपये दयावे लागतील. त्यावेळी मी त्यांना 20,000/- रुपये कशाचेत्र् असे विचारले असता, घटनास्थळ पंचनाम्याची प्रत देण्यासाठी 20,000/- रुपये दयावे लागतील आणि जो पर्यंत मी घटनास्थळ पंचनाम्याची प्रत देत नाही, तो पर्यंत तुमचा इन्शुरन्स क्लेम मंजूर होणार नाही असे मला त्यांनी सांगीतले. त्यावर विचार करुन सांगतो असे म्हणून मी तेथून निघून आलो. त्यानंतर दि. 29.11.2024 रोजी रात्री 08.09 वा.चे दरम्यान मला माझे वर नमूद मो.नं.वर पोलीस हवालदार श्री. सोनकांबळे यांचा त्यांचे मो.नंबर 8788381425 यावरुन फोन आला व पैसे देण्याबाबत काय विचार केलात्र् जो पर्यंत तुम्ही मला 20,000/- रुपये देत नाही तोपर्यंत मी तुम्हाला घटनास्थळ पंचनाम्याची प्रत देणार नाही, तुम्ही जरी माहितीच्या अधिकार कायदयाखाली पंचनामा मागीतला तरी मी तुम्हाला पंचनामा देत नाही असे म्हणून लागले, त्यावेळी मी त्यांना विनंती केली असता, त्यांनी मला आता लगेच त्यांचे मोबाईलवर ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास सांगीतले, त्यावर मी त्यांना उदया भेटण्यास येतो असे सांगीतले, त्यानंतर त्यांनी त्यांचा फोन बंद केला. माझ्याकडे वरील प्रमाणे होत असलेल्या लाच मागणीबाबत मी सविस्तर लेखी तक्रार पंचासमक्ष दिली. सदरची लेखी

तक्रार पोलीस उपअधीक्षक कुंभार साहेब व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्या केल्या.
सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला पोलीस हवालदार यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, ते वैराग पोलीस स्टेशन येथे असतील परंतु त्यांना कॉल करुन विचारावे लागेल असे मी सांगितले. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून प्रसाद भानवसे व पंच क्र.2 म्हणून अमित गायकवाड असे काम करायचे ठरले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक कुंभार साहेब यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर मला पो.हवा. सोनकांबळे यांना फोन करून त्यांची भेट कुठे होईल असे विचारण्यास सांगितले. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला असता मी पो. हवा. सोनकांबळे यांना त्यांचे मो.नं. 8788381425 वर 12.02 वाजता फोन करून स्पीकर चालू ठेवला त्यावेळी मी त्यांना कुठे आहे असे विचारले असता त्यांनी मला वैरागमध्ये आल्यावर फोन करण्यास सांगीतले. थोडया वेळाने पोउपअधी. श्री. कुंभार यांनी पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना पुन्हा फोन करण्याबाबत सूचना देवून व्हाईस रेकॉर्डर चालू केला असता, मी पुन्हा पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना 12.20 वाजता फोन करुन मी वैराग-गौडगांव रोडवरील चिंचेच्या झाडाजवळ आलो असल्याचे सांगीतले. त्यावेळी त्यांनी हा थांबा तीथ आलो मग मी.. असे बोलून मला वैराग-गौडगांव-धाराशीव कडे जाणारे रोडलगत असलेल्या चिंचेच्या झाडापाशी थांबण्यास सांगितले. आमच्यामधील फोनवरुन झालेले संभाषण पोउपअधी. श्री. कुंभार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डींग करुन घेतले आहे.
सदर ठिकाणी पो.हवा. श्री. सोनकांबळे यांचेवर लाच मागणीबाबत पडताळणी कारवाईसाठी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला तसेच पंच 01 श्री. भानवसे यांना योग्य त्या सुचना देवुन त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळ्यात अडकवून मला व पंच क्र. 1 श्री. भानवसे यांना माझेकडील मो. सायकल एम.एच. 11 ये क्यु 5233 पाठवले. काहीवेळाने पो.हवा. श्री. सोनकांबळे हे त्यांचे मोटार सायकल क्र. एम.एच 13 डी एक्स 1598 यावरुन चिंचेच्या झाडाजवळ येऊन भेट घेऊन प्रथम आमच्यात अवांतर चर्चा झाली त्यानंतर कामाच्या अनुषंगाने चर्चा करत असताना पो.हवा. श्री. सोनकांबळे यांनी पंचाबाबत विचारणा केली त्यावेळी मी त्यांना हे आपले मीत्रचाय..हेच काय नाहय विषय.. त्यावर त्यांनी कुठल ते.. असे विचारले असता मी त्यांना हे टेंभुर्णीचे असे सांगितले, त्यानंतर पो.हवा. श्री. सोनकांबळे यांनी माझे पत्रकार मित्र श्री. लोखंडे यांना कॉल केला फोनवर त्यांच्याशी पंचनामा व एफआयआर ची प्रत देण्याबाबतच चर्चा झाली त्यानंतर मी पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना सांगितले कि, आज नाहय कागद..आज कागद देत न्हाव. असे विचारलो, त्यावर त्यांनी सोमवारी देतो की..ती पंचनामा करावा लागल की.. असे सांगितले चर्चेदरम्यान मी त्यांना विचारले सर काय म्हणाले तुम्हाला त्यावर त्यांनी काय नाहय बोललो मी त्यांना कागदपत्रं करुन देतो सोमवारी- मंगळवारी चालतय मग अडचणं नाय हं.. अन् ही करा.. अस म्हणून त्यांनी त्यांचे उजव्या हाताची दोन बोटे दाखवून लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना चालतय मग मी काय करु आता घेवून येवू का त्याच्याकडं जावू आज जायच का कसं.. असे विचारलो तसेच मी त्यांना आता आपल ते सगळ झाल तर मग सगळच करतो म्हणाल ते..आता कित करायच शेवट असे विचारले असता त्यांनी बोललो तेवढ.. आलो आलो थांबा जरा.. वीस बोललो असे बोलून त्यांचे उजव्या हाताची दोन बोटे दाखवून वीस हजार रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी कमी करा म्हणलो होतो की. असे विचारलो असता तुम्हीय पाच कमी करा जावू दया चला पण आता दहा तर करा ..असे त्यांनी सांगितले. त्यानंतर मी त्यांच्याशी चर्चा करताना त्यांनी मग करा चला ओके..असे सांगितले. तेव्हा मी किती असे विचारले असता त्यांनी पंधरा, असे बोलले असता, मी त्यांनी पधंरा हजार असे विचारले असता त्यांनी हं.. करुन टाका बोलून पो.हवा. श्री. सोनकांबळे यांनी पंधरा हजार रुपये मागणी केली. त्यानंतर मी त्यांनी जर आज झाल तर मग कागद आजच दया.. असे बोलून पंचनाम्याची प्रत मागितली असता त्यांनी देतो तुम्हाला कागद ..तुम्ही फक्त कागदाची काळजीच करु नका असे सांगितले. त्यानंतर मी दुसऱ्याकडून पैसे घेवून येता असे सांगितले असता त्यांनी ये मग असे सांगितले. त्यानतर मी त्यांना पंधरा हजार त्यानं दिल की येतो तुम्हाला..लगीच पंचनामा झाला की कागद दया लगीच मला असे सांगितले असता त्यांनी ओके येतो असे बोलले. त्यावर मी त्यांना चालतय तुम्हाला फोन करतो.. पैशे मिळाले की फोन करतो.. असे सांगितले असता त्यांनी बघा तेवढं असे बोलले. त्यानंतर मी व पंच क्र.01 तिथून परत निघालो, व पोउपअधी. श्री. कुंभार व पथक थांबलेल्या ठिकाणी येवून भेट घेतली आणि घडलेली हकिकत सांगितली. पोउपअधी. श्री. कुंभार यांनी पंच क्र.01 भानवसे व मला घडलेली हकिकत विचारून घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंचाने सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.
सदर पडताळणी कारवाईदरम्यान पो.हवा. सोनकांबळे यांनी प्रथम 20,000/-रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 15,000/- रु. स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने पोउपअधी. श्री. कुंभार यांनी पो.

हवा. श्री. सोनकांबळे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती दिली, मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेले 10,000/- रू. रकमेच्या भारतीय चलनी नोटा व उर्वरीत खेळण्यातील नोटा असे एकूण 15,000/- रु. यावर त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या वरच्या खिशात ठेवले.
त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. सदरवेळी पोउपअधी. श्री. कुंभार पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून पोलीस स्टेशनला रक्कम घेऊन येत असल्याचे सांगुन ते कुठे भेटतील याबाबत विचारणा करण्यास सांगून त्यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला, त्याप्रमाणे मी पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना फोन करून स्पीकर चालू ठेवले व सांगितले कि, पैसे घेवून आलाता मित्र..काय तळ्यापाशी आलाय.. असे सांगितले असता, त्यांनी कुठाय तुम्ही.. असे विचारले असता मी त्यांना तळ्यापाशी आलाय ती..मी हाय हीकडं ती आपल मेजरसाब नाय का.. असे सांगितले. मी त्यांनी मग हीकड येताव का त्यापेक्षा मेजरसाबला.. असे सांगितले असता त्यांनी त्यांन आला की फोन करा की मला..येतो मी.. असे बोलले. परत थोडया वेळाने सदरवेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू केला, त्याप्रमाणे मी पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना फोन करून स्पीकर चालू ठेवून पो.हवा. श्री. सोनकांबळे यांच्याशी बोललो व त्यांना सांगितले कि, अं...म्हणजी आलय मीत्र पंधरा हजार रुपये घेवून..थांबलोय इथ राजेसाबला..मेजरसाब त्यावर त्यांनी हा..आलो आलो.दोन मिनीटात आलो.. असे बोलून फोन ठेवला.
पडताळणी दरम्यान माझे मित्र पैसे घेवून येत असल्याचे पो.हवा. श्री. सोनकांबळे यांना मी सागितल्यामुळे पंच क्र. 2 गायकवाड हे मित्र असून त्यांनी पैसे घेवून आले आहेत असे सांगण्याबाबत पोउपअधी. श्री. कुंभार यांनी सूचना दिली. त्याप्रमाणे पोउपअधी श्री. कुंभार यांनी सापळा कारवाई करण्याचे ठरवून वरील प्रमाणे सापळापुर्व कारवाई करुन, आम्हाला योग्य त्या सुचना देवून, मी दिलेली अँथ्रासिन पावडर लावलेली 10,000/- रू. रकमेच्या भारतीय चलनी नोटा व उर्वरीत खेळण्यातील नोटा असे एकुण 15,000/- रु. लाच रक्कम माझ्या शर्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवून, पो.हवा. श्री. सोनकांबळे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 व पचं क्र. 2 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन मेजरसाहब हॉटेल येथे रवाना केले. मी पंच क्र. 1 भानवसे व पंच क्र. 2 गायकवाड असे मेजरसाब हॉटेलमधील गार्डन येथे बसलो, व पो.उपअधी. श्री. कुंभार व सापळा पथक हे देखील मेजरसाहब हॉटेलमध्ये आतील बाजूस सापळा लावून बसून राहिले. थोडया वेळाने पो.हवा. श्री. सोनकांबळे त्यांच्या मोटारसायकल वरुन इतर एका इसमासोबत हॉटेलमध्ये येवून आमच्या समोर बसले. त्यावेळी आमच्यात पंचनामा व कागदपत्राबाबत चर्चा झाली चर्चेदरम्यान पोलीस हवलादार सोनकांबळे यांनी तुम्हाला कवा पाहिजे तेव्हा कागद घेवून जावा.. असे सांगितले. त्यावेळी त्यांनी दुस-या पंचाबाबत हे सर कुठले अशी विचारणा केली असता मी त्यांना हे अमीत सर ते मित्राय माझा सर नाहीत असे सांगितले. त्यानंतर आमच्यात अवांतर चर्चा झाली चर्चे दरम्यान हवलादार सोनकांबळे यांनी सांगितले कि, तुमच्याकडून मी काय घेतल नाही..तुम्ही आपल असल्यामुळे..नाहीतर माझ आपल 50-50....मयत जर झालना 50 घेतो मी वकीलाकडनं तुच्याकडनं नाय त्यावर मी त्यांना वकील तर काय त्याच्या हिश्श्याच देणाराय का तो पण आमचाच गळा कापणाराय पुन्हा असे सांगितले असता त्यांनी टक्केवारी वाढवतय की तिकड असे बोलले. त्यानंतर हवलदार सोनकांबळे यांनी नाही तुम्ही करा जेवण.. जातो आम्ही रिकाम केल तर... जातो आम्ही असे बोलून लाच रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांनी माझे शर्टच्या डाव्याबाजूच्या वरच्या खिशातील पैसे काढून त्यांच्या हातात दिले व त्यांनी एकदा हात मारुन घ्या.. असे सांगितले. सदर रक्कम पोहवा श्री. सोनकांबळे यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्यासोबत आलेल्या इसमाजवळ दिली. त्यावेळी मी ठरल्याप्रमाणे तोडवर हाथ फिरवून पैसे स्विकारलेबाबतचा इशारा सापळा पथकास दिला असता, पोअपअधी. श्री. कुंभार व पथकातील स्टाफ यांनी आमच्या जवळ येवून पोहवा. श्री. सोनकांबळे यांना ताब्यात घेतले व लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदर लाच रक्कम घेवून त्यांच्या सोबत असलेले इसमाजवळ दिल्याचे सांगितले. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांनी त्यांचा परिचय देवून पोहवा. श्री. सोनकांबळे यांना व त्यांचे सोबत असलेल्या इसमास नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. राहुल इरण्णा सोनकांबळे, वय-52 वर्षे, पद- पोलीस हवालदार ब.नं. 565, नेम- वैराग पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण, राहणार- सरोजिनी शिचल्लप्पा लोणी यांच्या घरी भाडयाने, डी 641, राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर असे सांगितले. व त्यांचे सोबत असलेल्या इसमाने त्याचे नाव श्री. मनोज किशोर वाघमारे वय 40 वर्षे, रा. सिध्दार्थ नगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर त्यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करुन सदर हॉटलमध्ये लोकांची गर्दी असल्याने सरकारी वाहनात सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर त्यांना घेवून वैराग पोलीस ठाणे येथे जावून गुन्हयाची कागदपत्रे ताब्यात घेवून सापळा कारवाईबाबत प्रभारी अधिकारी यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी,

सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पुर्ण करण्यात आली.
तरी दि. 30/11/2024 रोजी 12.02 ते 14.30 वा चे दरम्यान लोकसेवक श्री. राहुल इरण्णा सोनकांबळे, वय- 52 वर्षे, पद- पोलीस हवालदार ब.नं.565, नेम- वैराग पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण, राहणार- सरोजिनी शिवल्लप्पा लोणी यांच्या घरी भाडयाने, डी 641, राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर, यांनी मौजे वैराग गांवचे हद्दीत हॉटेल मेजरसाहब येथे माझ्या वडीलांचे झालेल्या अपघाताबाबत मला इन्शुरन्स कंपनीस क्लेम करणेसाठी आवश्यक असलेले घटनास्थळ पंचनामा कागदपत्र देण्यासाठी म्हणून स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन 20,000/- रू लाच मागणी करून तडजोडीअंती रु.15,000/- खाजगी इसम नामे श्री. मनोज किशोर वाघमारे, वय 40 वर्षे, रा. सिध्दार्थ नगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर यांचे करवी स्विकारुन बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची पिन्ट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश कुंभार)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NIVRUTTI HANUMANT MORE(I (Inspector)) / PCMAH88888 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NIVRUTTI HANUMAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMAH88888

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या OT खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)